पुणे जिल्हा परिषद, पुणे.
यशवंतराव चव्हाण भवन, वेलस्ली रोड, कॅम्प, पुणे - ४११ ००१.
शिक्षण विभाग (प्राथमिक)
Email- edupri.zppune@gmail.com | ssapune1@yahoo.co.in

# प्रथम मान्यता

जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा1/233/1803/2025 पुणे 1 दिनांक: 21/03/2025

प्रति,

अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक,
पुणे विद्यार्थी गृह संचालित
मुक्तांगण इंग्लिश मिडीयम स्कूल, ( 27251800412 ) सदाशिव पेठ, पुणे

विषय - महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा(स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत..

संदर्भ - 1. शासन निर्णय क्रमांक प्राशाव-2017/प्र.क्र.16/एसएम-5 दिनांक 19/09/2017
2.शाळेचा प्रस्ताव दिनांक 06/01/2025
3.श्रीम. मोमीन अस्मा बेगम मोहम्मद इमादोद्दीन, उपशिक्षणाधिकारी, जि.प.पुणे यांचेकडील तपासणी अहवाल 29/01/2025

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने प्रथम मान्यता करीता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार व तपासणी अधिकारी यांनी केलेली शिफारशी नुसारआपल्या संस्थेस संदर्भ क्र .1 ते 4 नुसार खालील अटी व शर्तीवर इयता 8 वी साठी प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाड | मान्यता वर्ग / इयत्ता | सुरु वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पुणे विद्यार्थी गृह | मुक्तांगण इंग्लिश मिडीयम स्कूल, ( 27251800412 ) सदाशिव पेठ, पुणे | इंग्रजी | इ. 1 ली ते.इ. 7 वी च्या शाळेला इ. 8 वी चा वर्ग जोडणे स्वयंअर्थसहाय्यित | इयता 8 वी | 2017-18 |

अटी व शर्ती

1. मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण इ.मध्ये भविष्यात शासनच्या परवानगीशिवाय कोणताही बदल करता येणार नाही.
2. शाळा व्यवस्थापनाने शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर त्या शाळेची परवानगी रद्द होईल.
3. स्वयंअर्थ सहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमानुसार व विनियमानुसार करण्यात यावी.
4. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
5. परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीच तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व महाराष्ट्र स्वयंअर्थ सहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
6. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयं अर्थ सहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा , मंडळ सलग्नता क्रमांक, UDISE कोड इ. तपशील दर्शविणारा फलक लावणे बंधन कारक राहील.
7. महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
8. शासन मान्यता पत्र क्र. प्राशाव-2017/प्र.क्र.16/एसएम-5 दिनांक 19/09/2017 मधील सर्व अटी व शर्ती पुर्ततेच्या अधिन राहुन मान्यता देणेत येत आहे.
9. महाराष्ट्र स्वयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 याअधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वय अर्थसहाय्यित शाळा म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.
10. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.
11. भविष्यात या शाळेच्या प्रथम मान्यते बाबत कोणत्याही स्वरुपाची तक्रार प्राप्त झाल्यास अथवा न्याय प्रविष्ठ प्रकरण उद्भवल्यास सदरचा प्रथम मान्यता आदेश रद्द करण्यांत येईल.

( संजय नाईकडे )
शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद,पुणे

Scanned with CamScanner

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका,
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, शिवाजीनगर, पुणे-५.
जावक क्रमांक - सप्रशिमा/ ५५५९ /१९९५-९६.
पुणे, दिनांक - ८/२/९६

शाळा प्रमुख,
[illegible]
[illegible] पुणे ३०

(इंग्रजी माध्यम)

यांस -

विषय - खाजगी प्राथमिक शाळेस मान्यता देणेबाबत.
संदर्भ - मा. शिक्षण मंडळ ठराव क्र. १३७ दि. २६-१२-९५.

तुमचे शाळेस सन ९५-९६ या शैक्षणिक वर्षापासून खालील अटींची पूर्तता करण्याचे अटीवर मान्यता देण्यात येत आहे. सदरची मान्यता प्रत्यक्ष सुरु असलेल्या इ.१ ली ते ४थी च्या वर्गांकरिता आहे.

१) सदर संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

२) शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असली पाहिजे.

३) शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक उत्तम कर्मचारी वृंद व शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेणी व सेवाशर्तींच्या अधीन राहून नेमला पाहिजे.

४) संस्थेची आर्थिक परिस्थिती संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापन, शिक्षक सुविधा इ. शाळा व्यवस्थित चालविण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

५) संस्थेने या शाळेसाठी शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मूल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वयन केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक त्या सुविधा पुरविल्या पाहिजेत.

६) संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी / कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंद वह्या ठेवाव्यात आणि त्या अद्ययावत स्वरुपात कार्यान्वीत ठेवल्या पाहिजेत.

७) शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशीरपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

.....(२)

Scanned with CamScanner

८) संस्थेने परवानगीसाठी प्रस्तावित केलेले माध्यम, इयत्ता व विद्यार्थी संख्या यांमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

९) संस्थेने शासनाच्या शैक्षणिक नियमित होणाऱ्या धोरणाचे कार्यपद्धतीचे नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

१०) संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देताना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरित परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

११) शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

सदर अटींची पूर्तता न केल्यास शाळेस दिलेल्या मान्यतेबाबत फेरविचार करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

तरी पुढे शाळेतील खालीलप्रमाणे माहिती [illegible] तक्त्यात दोन प्रतीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

तक्ता क्र.१

| इयत्ता | तुकडी | विद्यार्थी | | | सरासरी हजेरी |
|---|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | एकूण | |
| | | | | | |
| एकूण | | | | | |

तक्ता क्र.२

| अ.क्र. | शिक्षकाचे नाव | जात | जन्म दिनांक | नोकरीस लागल्याचा दिनांक | शैक्षणिक पात्रता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|

पुणे, दि. [illegible]

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

[illegible] सादर करावा.

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे
कार्यालय, दिनांक - ११.५.९४

प्रति,
शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग),
जिल्हा परिषद, पुणे-११.

विषय - सन १९९३-९४, शैक्षणिक वर्षात नवीन सालाची प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत ....

संदर्भ - शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. पीएसएस - १०९३/ (५१७०) प्राशि-३ दि. २०.१२.९३ व क्र. पीएसएस -१०९३ (५१३२) प्राशि- दिनांक - २.५.९४ चे पत्र.

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकन करावे.

याबाबत कळविण्यात येते की, शासनाने खाली नमूद केलेल्या संस्थेस ______________ तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमात जून, १९९३ पासून इयत्ता पहिली ते सन १९९३-९४ शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासाठी प्रत्येकी एका तुकडीस प्राथमिक शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विनाअनुदान तत्वावर खास बाब म्हणून परवानगी देण्यात येत आहे. तसेच संस्थेच्या माध्यमाच्या नवीन प्राथमिक शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| संस्थेचे नाव | शाळेचे नाव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|
| पुणे विद्यार्थी गृह पुणे | शिशु निकेतन प्राथ. शाळा, कसबा पेठ, पुणे -३० | जून १९९३ मध्ये इ. १ ली ते प्रत्यक्ष सुरु केलेल्या वर्गाच्या एका तुकडीस | इंग्रजी. |
| महर्षी कर्वे स्त्री शि. सं. पुणे | कर्वेनगर प्राथ. शाळा कर्वेनगर, पुणे-५२ | -"- | मराठी. |
| डी.एस. सी. एज्यु. सोसा. पुणे | सेंट मीरस स्कूल, कसबा पेठ पुणे-११. | -"- | इंग्रजी |
| [illegible] एज्यु. सोसा. पुणे | उर्दू माध्यम प्राथ. शाळा रामटेकडी झोपडपट्टी, पुणे -१३ | -"- | उर्दू |
| -"- | इंग्रजी माध्यम -"- | -"- | इंग्रजी. |

हस्तलिखित

.....(२)

२.१ सदर संस्था संस्था-नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

२.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असली पाहिजे.

२.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक दृष्ट्या आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद व शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेणी व सेवाशर्तींच्या आधारे राखून नेमला पाहिजे.

२.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापन, विधायक दृष्टी इत्यादी शाळेच्या व्यवस्थित चालविण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

२.५ संस्थेने या शाळेसाठी शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मुल्यमापन पध्दती, शाळा व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वयन केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजेत.

२.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंद वह्या अद्ययावत आणि विश्वासार्ह स्वरूपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

२.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशीरपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

२.८ संस्थेने परवानगीत विहित केलेले माध्यम, शाळेची जागा [illegible] मान्यतेशिवाय कोणताही बदल करता येणार नाही.

२.९ संस्थेने शासनाकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे [illegible] कार्यपद्धतीचे विनाअट पालन करणे आवश्यक आहे.

२.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देताना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

२.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

२.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी पुनर्जीवित करण्यासाठी अर्ज सक्षम प्राधिकाऱ्याकडे (परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे) करणे बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली

....(३)

(४)

२.९२ परवानगी रद्द समजण्यात येईल. एक वर्षानंतर नूतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

३.०० ~~रोजी व आमांत्या प्रत्येक शाळेसाठी रुपये १,०००/- (रुपये) एकीच एक रकमी रक्कम ४ ... जमा करणे आवश्यक आहे.~~

फक्त) अनामत रक्कम

ही परवानगी देण्यापूर्वी संस्थेने कळविलेल्या गोष्टी मान्य केलेल्या आहेत. पुन्हा यापैकी काहीही तपासून पाहण्याची त्याचप्रमाणे संस्थेने कोणत्याही शाळेची मान्यता घेण्यापूर्वी खात्री करून घ्यावी.

१) संबंधित संस्था ... नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

२) संबंधित ... गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३) सदर संस्थेने ... चालविलेल्या प्राथमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४) सदर संस्थेने ... चालविलेल्या प्राथमिक शाळांच्या संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारच्या ... चालत असल्याबाबत, तक्रारी आलेल्या नाहीत, अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५) संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६) संस्थेने विहित नमुन्यात करारनामा केला आहे. (न पूर्वी अर्ज केला नसल्यास तो करून घ्यावा.)

७) शासनाची मंजुरी असताना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रुपये १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

तरी या बाबतची पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरीत या कार्यालयात पाठवावा..

सही/ -

शिक्षण उपसंचालक,

पुणे विभाग, पुणे-१. ~~कोल्हापूर.~~ शिक्षण मंडळ पुणे-५

प्रत :- ... अधिकारी, महानगरपालिका, नगरपालिका ... यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत :- मा. सचिव ... संबंधित ... यांना माहितीसाठी अग्रेषित.

......................................

खरी प्रत

TRUE COPY

MACHHINDRA V NAGPURE
NOTARY GOVT OF INDIA

MACHHINDRA V. NAGPURE
AREA PUNE DIST.
MAHARASHTRA
REGD. NO
7693
NOTARY
GOVERNMENT OF INDIA

Scanned with CamScanner

जा. क्र. प्रा/प्राशि/खाप्राशा मान्यता
पोआर,
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक:- 2.2.94

NOTARY
P. S. KAMBLE
REGD No. 1352
PUNE.
GOVERNMENT OF INDIA

प्रति,
अध्यक्ष,
पुणे विद्यार्थी गृह, पुणे.

विषय:- सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत.

संदर्भ :- शासन शालेय शिक्षण विभागाकडील क्र. व्हीएलएस-१०९३/[७१४०]/प्राशि-३ दि. २०/१२/९३ व क्र. व्हीएलएस-१०९३/[७१३२]प्राशि ३ दि. २०/१/९४

वरील विषयाचे संदर्भाधीन शासनाकडील संदर्भाधीन पत्रान्वये आपल्या संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या सदाशिव पेठ, पुणे या ठिकाणावरील खाजगी प्राथमिक शाळेस मराठी/इंग्रजी माध्यमातून सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षी परवानगी देण्यात आलेली आहे. मात्र ही परवानगी शासनाने खालील अटींची पूर्तता संस्थेकडून होत असल्यासच शासनाने दिलेली असल्याने खालील अटींची पूर्तता संस्थेकडून होते किंवा कसे याबाबतचा अहवाल आपल्या जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी[प्राथमिक] जिल्हा परिषद प्रशासन अधिकारी, न.पा. शि. मं. यांचेकडे विनाविलंब सादर करून त्याची एक प्रत या कार्यालयाकडे परस्पर सादर करावी. म्हणजे परवानगी देण्याबाबतची पुढील कार्यवाही या कार्यालयात सादर करता येईल.

१] संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम, १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेच्या अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेच्या अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत करावी.

२] संस्थेविरुद्ध गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.



Scanned with CamScanner

३] सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एकाही [illegible] काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५] संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६] संस्थेने विहीत नमुन्यात सुधारित शुल्कासह अर्ज केला आहे.

७] शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

८] संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.

९] संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहीत मान्य शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.

१०] शाळेमध्ये प्रत्यक्ष सुरु असलेले वर्ग व त्यातील विद्यार्थी संख्या कळवावी.

~~११] शिक्षण अधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकड्या संस्था~~ उघडणार नाही असे संस्थेने रु. १०/- च्या स्टँप पेपरवर लेखी हमीपत्र देणे आवश्यक आहे.

१२] शासनाने ज्या माध्यमातून शाळा काढण्यास परवानगी देण्यात येणार आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकड्या संस्था/शाळा उघडणार नाही याची हमी रु. १०/-च्या स्टँप पेपरवर द्यावी.

१३] इंग्रजी माध्यमातून परवानगी द्यावयाच्या शाळांच्या संस्थांनी रु. २५,०००/-[रुपये पंचवीस हजार फक्त] अनामत रक्कम शासनाकडे जमा करावी लागेल. तरी त्याबाबतचे प्रथमतः हमीपत्र देण्यात यावे. ही रक्कम परवानगीचे पत्र मिळाल्यानंतर दोन आठवड्यात शासनाकडे जमा करावयाची आहे.

वरील अटींची पूर्तता होत असलेबाबतची माहिती सर्व कागदपत्रांसह शिक्षणाधिकारी [प्राथ] जि. प. /प्रशासन अधिकारी न. पा. शि. मं यांचेकडे त्वरित सादर करावी म्हणजे पुढील कार्यवाही त्वरित करता येईल.

NOTARY P. S. KAMBLE REGD. No. 1352 PUNE. GOVERNMENT OF INDIA

TRUE COPY

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१

प्रत-
१. शिक्षणाधिकारी[प्राथ.]जि. प. पुणे विभाग
२. प्रशासन अधिकारी, न. पा. शि. मं. पुणे विभाग, [illegible] माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

P. S. KAMBLE NOTARY, Govt. of India
6/XII/98

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे मनपा
कै.भाऊसाहेब शिरोळे भवन,
जुना तोफखाना,शिवाजीनगर, पुणे
जा.क्र./खाप्राशा/ ६३१५
दिनांक ८/१/१०

व्यवस्थापक/शाळाप्रमुख,
पुणे विद्यार्थी गृहाचे
शिशुनिकेतन इंग्लिश मिडीयम स्कूल,
१५८६, सदाशिव पेठ, पुणे ३०

विषय - कायम विनाअनुदानिततत्त्वावरील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग/ अतिरिक्त तुकड्या मंजुरीबाबत.

संदर्भ - शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. व्ही.एल.एस.

प्राशि- ३ दि.

संदर्भांकित शासन निर्णयानुसार तुमच्या शाळेतील खाली नमूद केलेल्या इयत्तांच्या नैसर्गिक/अतिरिक्त तुकड्या/वर्गांना कायम विनाअनुदानित तत्वावर भविष्यात अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

| अनु. | माध्यम | इयत्ता | वर्ग/ तुकडी | मंजुरीचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| | इंग्रजी | २-४ थी | नै.वाढ मध्यमवर्ग | जून २००७ |
| | | ६ वी | —"— | २००८ |
| | | ७ वी | —"— | २००९ |

अटी व शर्ती -

१. सदर शाळेने तुकड्यांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व्यवस्थापन विषय सुविधा उपलब्ध करून द्यावयास हव्यात.

२. शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.

३. शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेच्या आवश्यक शिक्षक उमेदवार शासनाने वेळोवेळी विहीत वेतनश्रेणीत व सेवा शर्तीच्या अधीन राहून नेमला पाहिजे.

४. सदर शाळेत स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.

५. सदर शाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या निकषानुसार पुरेशी असणे आवश्यक आहे.

६. सदर मंजुर करण्यात येणाऱ्या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. अनैसर्गिक स्पर्धा करू नये.

शिक्षणप्रमुख,
शिक्षणमंडळ पुणे महानगरपालिका

Inward / Outward No. 54
Date 12/1/2010

Received
Mrs. V. V. Gokhale

Scanned with CamScanner

शिक्षण मंडळ कार्यालय पुणे महानगरपालिका
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन,जुना तोफखाना,
फायनल प्लॉट क्र. ७८४ शिवाजीनगर ,
पुणे ४११ ००५.
जा.क्र. / खाप्राशा/८६८ / २०१४-१५
दि. ११.६.१४

प्रति ,
पुणे विद्यार्थी गृह संस्थचे ,
शिशुनिकेतन इंग्रजी माध्यम प्राथमिक शाळा ,
१७८६ सदाशिव पेठ ,
पुणे - ४११ ०३० .

विषय - खाजगी प्राथमिक शाळेच्या नावात बदल करणेबाबत
संदर्भ - पुणे विद्यार्थी गृह संस्थचे , शिशुनिकेतन इंग्रजी माध्यम प्राथमिक शाळा , यांचे जा. क्र. ६७५ दि.२१.०५.२०१४ अन्वये प्राप्त प्रस्ताव

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये पुणे विद्यार्थी गृह संस्थचे , शिशुनिकेतन इंग्रजी माध्यम प्राथमिक शाळा , या मान्यताप्रात शाळेचे नाव मुक्तांगण इंग्लिश मिडीयम स्कूल , सदाशिव पेठ शाखा असा बदल केलेल्या नावाची नोंद घेण्यात आलेली असून त्यानुसार सदर शाळेस नवीन नावाने संबोधण्यात व पुढील पत्रव्यावहार नवीन नावाने करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५-६-१४
शिक्षणप्रमुख
शिक्षणमंडळ पुणे महानगरपालिका

प्रत माहितीसाठी
मा. शिक्षण उपसंचालक ,
पुणे विभाग , पुणे १.

ss



VERNMENT O
OTARY GOVT OF

Scanned with CamScanner

8 वी मान्यता

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ तसेच महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ मधील तरतूदीनूसार राज्यातील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांना सन २०१६-१७ व २०१७-१८ पासून इयत्ता ५ वी चा व इयत्ता ८ वी चा वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास मान्यता देण्याबावत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्राशाव-२०१७/प्र.क्र.१६/एसएम-५
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
तारीख: १९ सप्टेंबर, २०१७

वाचा -

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः प्राशातु-१११२/(२५८/२०१३) / प्राशि-३, दिनांक २/७/२०१३,
२. शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः प्राशधो-२०१४/(१८१/२०१४) एसएम-५ दि. २४/०३/२०१५,
३. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः प्राशातु-१११२/(२५८/२०१२) प्राशि-३ दि. १३/२/२०१३,
४. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: -एसएसएन-२०१५/ प्र.क्र.१६/१५ / टिएनटी-२, दिनांक २८.८.२०१५,
५. शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक- खाप्राशा-२०१६/श्रीदबा/प्रशा-ड/५१२- अ -१/६०८६, दिनांक २८/१२/२०१६,
६. शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक- खाप्राशा-२०१६/८३१३/प्रशा-ड/ ५१२- अ -१/६११५, दिनांक ३०/१२/२०१६,
७. शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक-खाप्राशा/२०१७/१५३३०/प्रशा-ड/५१२-अ-१/७०१, दिनांक १४/२/२०१७,
८. शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक- खाप्राशा/२०१७/ड-५१२-अ-१ /१३०१, दिनांक २०/३/२०१७,
९. विभागीय शिक्षण उप संचालक नागपूर विभाग नागपूर यांचे पत्र क्रमांक-प्राथ/ब/५६६२/२०१७, दिनांक १५/७/२०१७,

प्रस्तावना:-

१.१ केंद्र शासनाचा बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ तसेच महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ मधील

Head Mistress
Pune Vidyarthi Griha's
Mu... English School
Sadashiv Peth Branch,
Pune-411030.

Head Mistress
Pune Vidyarthi Griha's
... English School
Sadashiv P... Branch,
Pune-4...

Scanned by CamScanner

Scanned with CamScanner

तरतुदींनुसार इयत्ता १ ली ते इयत्ता ८वी पर्यंतचे शिक्षण प्रारंभिक शिक्षण म्हणून विहीत करण्यात आले आहे.तरोच संदर्भाधीन क्र.३ येथील आदेशान्वये इयत्ता १ ली ते इयत्ता ५ वी पर्यंतचे शिक्षण कनिष्ठ प्राथमिक व इयत्ता ६ वी ते इयत्ता ८ वी पर्यंतचे शिक्षण उच्च प्राथमिक शिक्षण अशी संकल्पना अस्तित्वात आलेली आहे.यास्तव इयत्ता १ ली ते इयत्ता ५ वी च्या विद्यार्थ्यांना कनिष्ठ प्राथमिक स्तरानुरुप व इयत्ता ६ वी ते इयत्ता ८वी च्या विद्यार्थ्यांना उच्च प्राथमिक स्तरानुरुप दर्जाप्रमाणे अध्यापन करणे आवश्यक आहे.

१.२ उपरोक्त पार्श्वभूमी विचारात घेऊन तसेच प्राथमिक शिक्षण प्रणाली (Elementary Cycle) पूर्ण होण्याचे दृष्टीने तसेच राज्यातील प्रत्येक विद्यार्थ्याला नजीकच्या शाळेत इयत्ता ८ वी पर्यंतचे प्राथमिक/उच्च प्राथमिक शिक्षण उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इयत्ता १ ली ते इयत्ता ४ थी च्या शाळेला इयत्ता ५ वी चा वर्ग तसेच इयत्ता १ ली ते इयत्ता ७ वी च्या शाळेला इयत्ता ८ वी चा वर्ग जोडण्यास संदर्भाधीन क्र. (४) येथील आदेशान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्याचबरोबर, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांना इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी चे वर्ग जोडण्याबाबतचा प्रस्ताव संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था प्राधिका-यांच्या शिफारशीसह शासनास सादर करावयाचे निर्देश देण्यात आले होते. या निर्देशानुसार शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी संदर्भाधिन क्र. (५) ते (८) येथील पत्रान्वये राज्यातील खाजगी प्राथमिक शाळांना इयत्ता ५ वी चा व इयत्ता ८ वी चा वर्ग जोडण्यास मान्यता देण्याबाबत सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

२.१ सोबत जोडलेल्या प्रपत्रातील ०४ शाळांना इयत्ता ५ वी चा व १३ शाळांना इयत्ता ८ वी चा वर्ग सन २०१६-१७ व २०१७-१८ पासून जोडण्यास खालील अटींच्या व शर्तींच्या अधिन राहुन शासन मान्यता देण्यात येत आहे. या वर्गांचे वाटप शिक्षण संचालक, (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी करावे.

१. शाळेला वर्ग खोली उपलब्ध करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.
२. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतूदीनुसार भौतिक सोयी सुविधा व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करणे बंधनकारक राहील.

Scanned by CamScanner

Scanned with CamScanner

३. संदर्भाधिन क्र. (४) येथील शासन निर्णय दिनांक २८/८/२०१५ अन्वये नैसर्गिक वाढीने वर्ग मंजूर करणे बंद केले असल्याने इयत्ता ५ वी नंतर तसेच इयत्ता ८ वी नंतर प्रस्तुत शाळांना नैसर्गिक वाढीने वर्ग मंजूर करणे लागू राहणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(प्र.रा. मुंढे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा.मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. मा. प्रधान सचिव,(शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे स्वीय सहाय्यक,
३. मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य,पुणे,
४. शिक्षण संचालक(प्राथमिक), महाराष्ट्र राज्य,पुणे,
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई, पुणे, कोल्हापूर, लातूर नागपूर,
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, ठाणे, पुणे, अहमदनगर, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी, उस्मानाबाद, नांदेड, नागपूर,
७. आयुक्त, संबंधित महानगरपालिका,
८. मुख्याधिकारी, संबंधित नगरपरिषद/नगरपालिका,
९. शिक्षणाधिकारी(प्राथमिक), जिल्हा परिषद, ठाणे, पुणे, अहमदनगर, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी उस्मानाबाद, नांदेड, नागपूर
१०. निवडनस्ती-(एसएम-५).

Scanned by CamScanner

Scanned with CamScanner

प्रपत्र

शासन निर्णय क्रमांक. प्राशाव- २०१७/ प्र.क्र - १६/ एसएम-५ दि. १९ सप्टेंबर, २०१७ चे परिशिष्ट इंग्रजी/मराठी/हिंदी माध्यमाचे स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मंजूर करावयाचे वर्ग

| अ.क्र. | संस्थेचे नाव / शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | इयत्ता | ज्या वर्षापासून मंजूर करावयाचे ते वर्ष | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| | जिल्हा ठाणे | | | | |
| १ | कै. भाऊसाहेब भोर विद्यामंदिर सरस्वती विद्या संस्था, अंबरनाथ जि. ठाणे | हिन्दी | इयत्ता ५ वी | २०१६-१७ | स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर |
| | जिल्हा पुणे | | | | |
| २ | प्रगती विद्या मंदिर पूर्व प्राथमिक शाळा, स.नं. १५ औदुंबर सोसा. वारजे जकात नाका, पुणे | मराठी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ | स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर |
| ३ | मुक्तांगण इंग्लिश मिडीयम, स्कुल सदाशिव पेठ, पुणे | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ | स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर |
| ४ | वनाझ परिवार विद्यामंदिर, ८५/१ पौडरोड शास्त्रीनगर कोथरुड, पुणे | मराठी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ | स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर |
| | जिल्हा सांगली | | | | |
| ५ | मा.कै. गोविंदराव लिमये प्राथ.शाळा आष्टा ता.वाळवा जिल्हा सांगली | मराठी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ | स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर |
| ६ | राजाराम बापू मिलीटरी स्कुल ॲन्ड स्पोर्टस इस्लामपूर ता. वाळवा जि. सांगली | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ | स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर |
| | जिल्हा रत्नागिरी | | | | |
| ७ | जगदगुरु नरेंद्रचार्य महाराज संस्था स्कूल नांजी जि. रत्नागिरी | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ | स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर |
| | जिल्हा कोल्हापूर | | | | |
| ८ | श्री दत्ताबाळ मिशन डिव्हाईन संचलित श्री. दत्ताबाळ प्राथमिक विद्यामंदिर कसबा बावडा, जिल्हा कोल्हापूर | मराठी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ | स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर |

Scanned by CamScanner

Scanned with CamScanner

Inward/Outward No: 202/23-24
Date: 23/3/24

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४३२,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
Email ID:- sm२.sesd-mn@gov.in

क्रमांक:-एसएफएस-१०२२/प्र.क्र.११७७/एसएम-२ दिनांक:- १५ मार्च, २०२४.

## मान्यता पत्र

**प्रति,**

अध्यक्ष / सचिव,
**पुणे विद्यार्थी गृह, पुणे.**

**विषय-** महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरू करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र...

**पुणे विद्यार्थी गृह, पुणे संचलित मुक्तागंण इंग्लिश स्कुल, नगर भुमापन क्र. १७८६, सदाशिव पेठ, पुणे, ता. जि. पुणे.**

संदर्भ- इरादा पत्र क्रमांक एसएफएस-१०२२/प्र.क्र.११७७/एसएम-२, दि. ०२.०१.२०२३.

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत **पुणे विद्यार्थी गृह, पुणे** या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून **मुक्तागंण इंग्लिश स्कुल, नगर भुमापन क्र. १७८६, सदाशिव पेठ, पुणे, ता. जि. पुणे या उच्च प्राथमिक शाळेला जोडून माध्यमिक ( इ. ९ वी ते १० वी, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ)** या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर दर्जावाढ करण्याकरिता अर्ज सादर केला होता.

२. आपल्या अर्जाच्या संदर्भात, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ पासून **पुणे विद्यार्थी गृह, पुणे संचलित मुक्तागंण इंग्लिश स्कुल, नगर भुमापन क्र. १७८६, सदाशिव पेठ, पुणे, ता. जि. पुणे या उच्च प्राथमिक शाळेला जोडून माध्यमिक ( इ. ९ वी ते १० वी, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ)** स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर दर्जावाढ करण्याकरिता, अटीं व शर्तीसह इरादा पत्र दिले होते. आता सदर शाळेस **शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५** पासून दर्जावाढ करण्याची मान्यता, पुढील अटीं व शर्तीस अधीन राहून देण्यात येत आहे.

**३. अटी व शर्ती :-**

१) प्रस्तावित शाळा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यांद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटींची व शर्तीची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तीची पूर्तता करील.

२) नोंदणीकृत संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ याद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांचे, अटींचे व शर्तीचे आणि या

Scanned with CamScanner

अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांचे किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा अटींचे आणि शर्तींचे पालन करणे अनिवार्य आहे.

३) सी.बी.एस.ई. किंवा सी.आय.एस.सी.ई. किंवा सी.ए.आय.ई. किंवा आय.बी. इत्यादी मंडळाच्या संलग्नतेसाठी इच्छुक शाळा व्यवस्थापनांनी, शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशांनुसार, शासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे.

४) शाळा व्यवस्थापन, शासनाने मंजूर केलेल्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यापूर्वी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षण अधिकाऱ्यास कळवील.

५) या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये नवीन शाळेची स्थापना करण्यासाठी किंवा शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी दिलेली परवानगी, ती ज्या शैक्षणिक वर्षासाठी मंजूर केली आहे, त्याच वर्षासाठी असेल.

६) जर शाळा व्यवस्थापन, १८ महिन्यांच्या आत, शाळा सुरु करण्यास अपयशी ठरल्यास, दिलेले मान्यता पत्र रद्द होईल.

७) शाळा व्यवस्थापनास, मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण, भविष्यात, शासनाच्या परवानगीशिवाय बदलता येणार नाही.

८) जर शाळा व्यवस्थापनाने, शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर, त्या शाळेची परवानगी रद्द होईल.

९) अशी तरतूद करण्यात आली आहे की, स्वयं अर्थसहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व विनियमांनुसार करण्यात यावी.

१०) जिल्हानिहाय माहिती भरतेवेळी, ज्या शाळेस परवानगी देण्यात आली आहे, ती शाळा, स्वतंत्र प्रवर्ग म्हणून "स्वयंअर्थसहाय्यित शाळा" अशी माहिती भरतील व यु.डी.आय.एस.इ. क्रमांक मिळवितील. यासंबंधात, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांस, नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

११) शाळा व्यवस्थापन, शाळा परिसराच्या प्रवेशद्वारावर "स्वयंअर्थसहायित परवानगीप्राप्त शाळा" असा फलक लावतील.

१२) या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा प्रमाणकांचे अथवा अटी व शर्तींचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणावरुन, कोणत्याही वेळी, राज्य शासन, दिलेले मान्यता पत्र रद्द करु शकेल.

(विवेक सपकाळ)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

**प्रत माहितीसाठी -**

१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. राज्य प्रकल्प संचालक महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे.
७. निवडनस्ती एसएम-२/ (प्र.क्र.११७७/२०२२)

०४९

Scanned with CamScanner

# शिक्षण उपसंचालक कार्यालय- पुणे विभाग

१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.
दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ ई मेल आय डी क्र. dydpune@gmail.com
वेब साईट- WWW.dydepune .com

जा.क्र. शिउसं/प्राथ-२०४ /ज रा कु/मान्यता/पुवि/२०२४/ 08286
दिनांक : - 8 AUG 2024

प्रति,

अध्यक्ष/ सचिव, पुणे विद्यार्थी गृह, पुणे

विषय : महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून इ. ९ वी ते इ. १० वी इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ संलग्नित नविन/दर्जावाढ शाळा सुरु करणेसाठी स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर निर्गमित शासन मान्यतेचे अनुषंगाने करावयाचे कार्यवाहीबाबत.
पुणे विद्यार्थी गृह पुणे संचलित मुक्तांगण इंग्लिश स्कुल, नगर भुमापन क्र. १७८६ सदाशिवपेठ पुणे ता.जि. पुणे

संदर्भ : १. विवेक सपकाळ, कार्यासन अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश जा.क्र. एसएफएस- १०२२/प्र.क्र ११७७/एसएम-२ दिनांक १५.३.२०२४
२ संचालक पुणे विद्यार्थी गृह पुणे यांचे पत्र जा क्र पुविगृ/११३९/२०२४-२५ दिनांक २३.७.२०२४ या कार्यालयास प्राप्त आवक क्रमांक १०६२७दिनांक ३०.७.२०२४

उपरोक्त विषयाबाबत महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत पुणे विद्यार्थी गृह पुणे संचलित मुक्तांगण इंग्लिश स्कुल, नगर भुमापन क्र. १७८६ सदाशिवपेठ पुणे ता.जि. पुणे ( प्राथमिक शाळेला जोडून माध्यमिक इ. ९ वी ते इ . १० वी इंग्रजी माध्यम राज्यमंडळ ) स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर संदर्भीय क्र. १ चे शासन आदेशात अ.क्र. १ ते १२ अटी व शर्तीस अधिन राहून शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर दर्जावाढ करण्याची मान्यता देण्यांत आलेली आहे.

सदर संदर्भीय क्र. १ चे शासन आदेशातील अ.क्र. १ ते १२ अटी व शर्ती आपल्या संस्थेस/ शाळेस बंधनकारक असून त्यानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम २०२० मधील तरतुदीनुसार करण्यांत यावी.

(राजेंद्र अहिरे)
अध्यक्ष, क्षेत्रस्तरीय प्राधिकरण,
तथा शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

प्रत : माहितीस्तव रवाना
श्री विवेक सपकाळ, कक्ष अधिकारी शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२

प्रत : माहितीस्तव व कार्यवाहीस्तव रवाना
शिक्षणाधिकारी (माध्यमिक/ प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे

Scanned with CamScanner

शिक्षण विभाग माध्यमिक
यशवंतराव चव्हाण भवन (जुनी इमारत)
पुणे जिल्हा परिषद, पुणे
सोमवार पेठ, पुणे - 11

मेल आयडी - rmsapunezp@gmail.com
दूरध्वनी क्रमांक ०२०-२६०६१७३३

जा.क्र.जि.प./शिक्षण/माध्य/कार्या.क्र.११/४६६/८४३८/२०२४
दि. १२ /०९ /२०२४

परवानगी वर्ष-२०२४-२५
परवानगी प्रकार- नविन शाळा
शाळा सुरु वर्ष-२०२४-२५

**स्वयंअर्थसहायित तत्त्वावरील परवानगी प्राप्त शाळा**
**प्रथम मान्यता**

प्रति,

१. अध्यक्ष/सचिव, पुणे विद्यार्थी गृह, सदाशिव पेठ पुणे.
२. मुख्याध्यापक, मुक्तांगण इंग्लिश स्कुल, भुमापन क्र.१७८६, सदाशिव पेठ, पुणे.

**विषय :- स्वयंअर्थसहायित तत्त्वावर नवीन शाळेस प्रथम मान्यता देणेबाबत.**
**(इयत्ता- ०९ वी १० वी वर्गास् प्रथम मान्यता)**

**संदर्भ** :- १. माध्यमिक शाळा संहिता आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम-**१२.**
२. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचेकडील मान्यता पत्र जा.क्र.एसएसएफ -१०२२/ प्र.क्र.११७७/एसएम-२ दि. १५ मार्च,२०२४.
३. आपलेकडील प्रस्ताव जा.क्र. /२०२३-२४ दिनांक.११/०६/२०२४ (या कार्यालयाकडे प्राप्त दिनांक.२०/०६/२०२४) रोजीचा प्रस्ताव.
४. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि प पुणे यांचेकडील दिनांक.१६/०७/२०२४ रोजीचा चौकशी अहवाल.
५. या कार्यालयाची मान्य टिपणी दिनांक.११/०९/२०२४.

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, आपल्या संस्थेस महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम-२०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणेस/ विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी संदर्भ क्र.२ अन्वये शासन परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानुसार विहित कालावधीत वर्ग सुरु करुन त्यांना मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव आपण संदर्भ क्र.३ अन्वये या कार्यालयास सादर करण्यात आलेला होता. आपले प्रस्तावानुसार शाळेने पुढीलप्रमाणे वर्ग सुरु केलेले असून सदर वर्गांना संदर्भ क्रमांक ४ अन्वये संदर्भ क्रमांक ५ नुसार खालील नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| शासन निर्णय, यादीतील क्रमांक | संस्थेचे नाव | शाळेचे नाव | माध्यम | शिक्षण मंडळ | प्रथम मान्यता वर्ग | मान्यता वर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचेकडील मान्यता पत्र जा.क्र.एसएसएफ -१०२२/ प्र.क्र.११७७/ एसएम-२ दि. १५ मार्च,२०२४ | पुणे विद्यार्थी गृह, सदाशिव पेठ पुणे | मुक्तांगण इंग्लिश स्कुल, भुमापन क्र.१७८६, सदाशिव पेठ, पुणे | इंग्रजी | नविन शाळा (राज्यमंडळ) | इ ९ वी<br>इ १० वी | २०२४-२५<br>२०२४-२५ | |
| **यादीतील क्रमांक** — नविन | | UDISE **२७२५१८००४१२** | | | | | |

**अटी व शर्ती-**

१. सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९ मधील तरतूदींची व त्या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या सर्व नियमांची पूर्तता करणे आवश्यक आहे.
२. परवानगी देण्यात आलेल्या शाळेस, (अ)शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे व कार्यपद्धतीचे तसेच, (ब)महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम-२०१२ मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील.
३. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी व मान्यता आपोआप रद्द समजण्यात येईल.
४. U-DISE (Unified District Information System for Education) यु-डाईस कोड प्राप्त करुन घेणे व दरवर्षी त्यामधील माहिती अद्ययावत करणेची जबाबदारी संबंधित संस्था/शाळेची राहील.



Scanned with CamScanner

५. सर्व संबंधितांच्या माहितीसाठी **स्वयंअर्थसहायित तत्त्वारील नवीन/दर्जावाढ परवानगीप्राप्त शाळा** असा जाहीर फलक शाळेच्या प्रवेद्वारावर लावणे आवश्यक राहील.

६. जे वर्ग सुरु करण्यास शासनाने परवानगी दिलेली आहे त्या वर्गाव्यतिरिक्त इतर वर्ग चालविता येणार नाहीत.

७. SARAL (Systematic Administrative Reforms for Achievment of Learning By Students) सरल प्रणालीवर (शाळा, विद्यार्थी, शिक्षक,इत्यादी बाबतची) माहिती भरणे व ती वेळोवेळी अद्ययावत करणे आवश्यक राहील.

८. शाळेतील आवश्यक सर्व नोंदी व अभिलेखे अद्ययावत ठेवून ते वेळोवेळी प्रमाणित करुन घ्यावेत.

९. वर्गामध्ये विहित प्रवेश क्षमतेच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत. पटपडताळणी/संचमान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी.

१०. शाळेत पात्राताधारक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची नियुक्ती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणानुसार करावी.

११. शाळेतील नियुक्त मुख्याध्यापक अथवा शिक्षकांना खाजगी शिकवणी वर्गामध्ये काम करता येणार नाही याची दक्षता घ्यावी.

१२. व्यवस्थापकीय संस्था ही, विहित केलेले नियम, मानके व प्रमाणकांनुसार शाळा चालविली जात असल्याची खात्री करुन घेईल व दर्जेदार शिक्षण देण्यास बांधील असेल.

१३. शासनाचे वतीने एखाद्या अधिकाऱ्यास आवश्यक असेल तेव्हा कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत केव्हाही शाळेत प्रवेश करता येईल व तिची तपासणी करता येईल.

१४. याद्वारे ज्या वर्गांना स्वयंअर्थसहायित तत्वावर मान्यता देण्यात आली आहे त्यांना भविष्यात कधीही शासकीय अनुदान तसेच कोणत्याही प्रकारचे आर्थिक साहाय्य देय असणार नाही.

१५. शालेय शुल्क निश्चित करताना, महाराष्ट्र शैक्षणिक शुल्क (विनियमन) अधिनियम-२०११ आणि महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम-१९८७ मधील तरतूदी तसेच शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या कार्यपध्दतीचे पालन करावे.

१६. शाळा बंद करणे- शासनास किमान अठरा महिन्यांची पूर्वसूचना दिल्याखेरीज स्वयंअर्थसहायित तत्त्वावर स्थापन केलेल्या शाळा बंद करता येणार नाही.

१७. एखाद्या शाळेने, त्यांना लागू असलेल्या कायद्यातील कोणत्याही तरतूदींचे किंवा नियमांचे उल्लंघन केल्यास किंवा शासनाने निर्धारित केलेली प्रमाणके किंवा मानके किंवा अटी व शर्तीची पूर्तता करणे थांबविल्यास, विद्यार्थ्यांच्या हिताला बाधा पोचविणारी कृती केल्यास किंवा दर्जाहीन शैक्षणिक कामगिरी केल्यास, शाळेची मान्यता/परवानगी काढून घेण्यात येईल.

१८. जनहित याचिका क्रमांक-४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निदेशांनुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

a. शाळेमध्ये पुरेशी व सुयोग्य अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी. (Fire Audit)

b. शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येऊ नयेत.

c. शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.

d. शाळेची इमारत, सर्व दृष्टी कोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकांप्रमाणे शाळेची इमारत बांधलेली असल्याची खात्री करावी.

e. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. (Structural Audit)

f. ज्या मंडळाशी शाळा संलग्नित होणार आहे त्या मंडळाने विहित केलेले निकषांची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

१९. संदर्भ क्र.२- शासन निर्णय दि.१४/०७/२०१७ व संदर्भ क्र.३ शिउसं पत्र दि.१२/०२/२०२० अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून, माध्यमिक शाळा संहिता कलम-४ अन्वये सदर मान्यता देण्यात येत आहे.

२०. सदरची प्रथम मान्यता ही तात्पुरत्या स्वरुपाची असून पुढील पाच वर्षांकरिता लागू असेल. त्यानंतर कायम मान्यता घेण्यात यावी. शाळेची प्रगती विचारात घेऊन मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत विचार करणेत येईल.

२१. पाच वर्षाच्या कालावधीनंतर कायमपणे मान्यता देण्याचा या कार्यालयाकडून विचार करण्यात येईल. मात्र शाळेने, या आदेशातील व इतर कायद्याने घालून दिलेल्या तसेच शासनाने वेळोवेळी विहित अटी व शर्ती पूर्ण करणे चालू ठेवले पाहिजे.

**(डॉ भाऊसाहेब कारेकर)**
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे

**प्रत, माहितीस्तव,**

**१. मा.विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे-१.**

**२. मा.विभागीय सचिव, पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे-५.**

Inward / ~~Outward~~ No.
206/24-25
Date:- 18/09/2024

Scanned with CamScanner